महा मेट्रो

PUNE METRO

# पुणे मेट्रो प्रोजेक्टच्या देखरेखसाठी वॉर रूमची स्थापना

पुणे , १५ जानेवारी २०१९ : पुणे मेट्रोचे काम सुनियोजित पद्धतीने चालू असून या कामाच्या देखरेखीसाठी मेट्रोने वॉर रूमची स्थापना केली आहे . मेट्रो संपूर्ण कामावर देखरेखीसाठी 5 D BIM हे तंत्रज्ञान वापरत असून त्यामुळे कामाच्या प्रगतीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होत आहे . 5 D BIM या प्रकल्पाचा एक हिस्सा म्हणून वॉर रूमची स्थापना करण्यात आली आहे . डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी दि . १४.१.२०१९ रोजी सिव्हिल कोर्ट कार्यालयात “वॉर रूम” चे उदघाटन केले . या वॉर रूम मध्ये ६ मोठ्या आकाराचे डिस्प्ले बोर्ड लावण्यात आले असून प्रत्येक बोर्डला मेट्रोच्या विविध अंगाची प्रगतीचे विविध पॅरामीटर द्वारे अवलोकन करण्याची प्रणाली विकसित करण्यात आली आहे .या प्रणालीत प्रकल्पाची त्रिमितीय आराखडे , प्रकल्पावर झालेला प्रत्यक्ष खर्च आणि प्रकल्पाचे वेळेनुसार ठेवलेले उद्दिष्ट्य याचे अवलोकन करण्याची सुविधा आहे . या प्रणालीद्वारे एखादे काम जर वेळेवर होत नसेल तर त्याचा अलार्म इमेज द्वारे संबंधित त्या अधिकारीला जातो . ज्यामुळे त्या कामावर पाळत ठेवून राहिलेल्या भरपाई करता येते .

या वॉर रूम मध्ये मेट्रो कामाची प्रत्यक्षदर्शी प्रोग्रेस बघण्याची सुविधा आहे . मेट्रो कामाच्या आरेखन ( drawing ) या प्रणालीमध्ये अपलोड करण्यापासून सुरवात होते , पुढे काँक्रीट ओतल्यावर त्याची प्रगती ऑनलाईन सिस्टिम द्वारा 5 D BIM मध्ये भरण्यात येते . अशाप्रकारे एखादे पिअर किंवा सेगमेंट लाँच झाल्यावर वेळोवेळी झालेली प्रगती या सिस्टिम मध्ये टाकण्यात येते . ही प्रणाली अशा सर्व कामांचे एकत्रीकरण करून एकसंध अशी माहिती दृश्यपटलावर ठेवते . या प्रणालीमध्ये विविध रिपोर्टद्वारे मेट्रो कामावर देखरेख ठेवण्यात येते . मेट्रो काम वेळेवर पूर्ण करण्यासाठी वॉर रूम मुळे मोलाची मदत होणार आहे .